# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.
ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org
दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१९/1391 दि. 19/6/19

**तात्काळ अत्यंत महत्वाचे**

प्रति,
प्राचार्य/संस्था प्रमुख,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित, कायम विना-अनुदानित
**कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये,**
जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

विषय: **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

संदर्भ: मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/८०१०, दि.१८.०६.२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र असूनही अद्याप अर्ज केलेले नसतील अशा विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज करण्यासाठी दि.३०.०६.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता ही शेवटची संधी देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी त्यांचे विद्यार्थ्यांना तात्काळ कळविण्यात यावे.

MahaDBT Portal वर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे, तसेच महाविद्यालयातील लिपिक, प्राचार्य यांना अर्जांची पडताळणी करण्यासाठी सहाय्य व्हावे यासाठी व्हिडीओ मॅन्युअलउपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी भरलेले शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालय / शैक्षणिक संस्था स्तरावरुन दररोज निकाली काढणे आवश्यक आहे, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय / शैक्षणिक संस्था स्तरावर अर्ज प्रलंबित ठेऊ नयेत. प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. त्यामुळे प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्येउद्भवणाऱ्या बाबीस संबंधित महाविद्यालय / शैक्षणिक संस्था सर्वस्वी जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. इन्स्टिटयुट लॉगीनवरुनउपस्थिती बाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी. डीडीओ व्दारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रिडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे.

महाविद्यालय / शैक्षणिक संस्था स्तरावर एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

RSDhemmarkar
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत :- मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर